Agrowon, 28/02/2026

# उडदासाठी ६०० रुपये बोनस, मोहरीसाठी भावांतर योजना

## मध्य प्रदेश सरकारचा मोठा निर्णय





**भोपाळ** : मध्य प्रदेश सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. राज्य सरकारने मोहरीसाठी भावांतर योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच सरकारने उडदाच्या खरेदीसाठी प्रति क्विंटल ६०० रुपये बोनस देण्याचा निर्णय घेतला आहे.

भावांतर योजनेअंतर्गत बाजारातील दर जेव्हा किमान आधारभूत किमतीपेक्षा खाली येतात तेव्हा शेतकऱ्यांना दरातील फरक मिळतो. यंदा मध्य प्रदेशात मोहरी पीक उत्पादनात २८ टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोहरी पिकासाठी भावांतर योजना जाहीर केली आहे.

मुख्यमंत्री मोहन यादव यांनी नुकतीच राज्य विधानसभेत ही घोषणा केली. राज्य सरकारने २०२६ हे 'शेती कल्याण वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. कडधान्ये खरेदीसंदर्भात निर्णयामुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळेल आणि त्यांचा सर्वांगीण विकास होईल, असे सरकारकडून सांगण्यात आले आहे.

यादव यांनी सांगितले, की राज्यात यंदा मोहरी पीक क्षेत्रात गेल्या वर्षीच्या तुलनेत जवळपास २८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, उत्पादन सुमारे १५.७१ लाख टन अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालास फायदेशीर दर मिळावा आणि त्याद्वारे मोहरी लागवडीला प्रोत्साहन देणे, हा सरकारचा उद्देश आहे.

ते पुढे म्हणाले, की जानेवारीमध्ये मोहरीचा सरासरी बाजारातील दर प्रति क्विंटल सुमारे ६ हजार रुपये होता. तर केंद्र सरकारने यासाठी प्रति क्विंटल ६२०० रुपये किमान आधारभूत किंमत (एमएसपी) निश्चित केली आहे. त्यासाठी राज्य सरकारने भावांतर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना निर्धारित तरतुदी आणि पात्रतेच्या आधारे योग्य भरपाई देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी केंद्राला प्रस्ताव आधीच पाठवण्यात आला असल्याची माहिती त्यांनी दिली.

या योजनेअंतर्गत, मोहरीसाठी नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना पात्रता, लागवड क्षेत्र आणि राज्याच्या सरासरी उत्पादन क्षमतेच्या आधारे किमान आधारभूत किमतीतील (एमएसपी) तूट भरपाई मिळेल. सरकारने उन्हाळी उडदासाठी प्रति क्विंटल ६०० रुपये बोनस देण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. मुगाऐवजी उडीद पीक घेण्यास प्रोत्साहन देण्यासाठी हमीभावाव्यतिरिक्त बोनस दिला जाईल, असे यादव यांनी नमूद केले.

किंमत आधार योजनेअंतर्गत, राज्य सरकारकडून केंद्राला ६.४९ लाख टन हरभरा आणि ६.०१ लाख टन मसूर खरेदीसाठी प्रस्ताव दिला आहे. प्रस्तावित खरेदी प्रक्रिया २४ मार्च ते ३० मे २०२६ दरम्यानच्या कालावधीत हमीभावानुसार होईल. यासाठी २० फेब्रुवारी ते १६ मार्च २०२६ या काळात नोंदणी होईल.

# ‘पणन’कडून ७६५ कोटींचा शेतमाल निर्यात

## निर्यात सुविधा केंद्राच्या वापरातून डिसेंबर २०२५ अखेरची स्थिती; गतवर्षापेक्षा यंदा शेतमाल निर्यातीत २२८ कोटींनी वाढ

**पुढारी वॉच**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधांचा वापर करून यंदाच्या २०२५-२६ या वर्षात सुमारे १० हजार ६३५ मेट्रिक टन इतक्या शेतामालाची निर्यात ३१ डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण झाली आहे. या शेतमाल निर्यातीची एकूण किंमत ७६५ कोटी ७२ लाख रुपयांइतकी असल्याची माहिती पणन मंडळातून देण्यात आली. गतवर्षी ३१ डिसेंबर २०२४ अखेर ५३७ कोटी १२ लाख रुपये किमतीचा ७ हजार ४५० मे. टन शेतमाल परदेशात निर्यात झाला होता. याचा विचार करता यंदा २२८ कोटींनी शेतमाल निर्यातीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.**

देशात महाराष्ट्र हे कृषिमाल विशेषत: फळे व भाजीपाला उत्पादनामध्ये आणि निर्यातीमध्येही अग्रेसर राज्य म्हणून गणले जाते. राज्यात उत्पादित होत असलेल्या द्राक्ष, डाळिंब, केळी, आंबा, संत्रा, कांदा तसेच भाजीपाला पिकांमध्ये प्रामुख्याने भेंडी, कारले, शेवगा, तोंडली, हिरवी मिरची आदी मालाच्या देशातून होणाऱ्या निर्यातीत महाराष्ट्राचा अग्रगण्य वाटा आहे. मार्चअखेर पणन मंडळ निर्यात सुविधांचा लाभ घेऊन सुमारे १३ ते १४ हजार मे. टन कृषिमाल हाताळणी होण्याचा अंदाज आहे.

कृषिमालाची एका देशामधून दुसऱ्या देशात निर्यात होत असताना किडी व रोगाचा प्रसार होऊ नये तसेच त्यावर नियंत्रण राहावे म्हणून जागतिक अन्न संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय पीकसंरक्षण करार केला आहे. हा करार आंतरराष्ट्रीय पीकसंरक्षण करार म्हणून ओळखण्यात येतो. युरोपियन देशांनी कृषिमाल आयात करताना कीडनाशक उर्वरित अंशाचे प्रमाण महत्तम मर्यादेच्या आत ठेवण्याचे स्वत:चे निकष ठरविले आहेत. त्यामुळे ज्या देशांना कृषिमाल निर्यात करावयाचा आहे, त्या देशातील नियम व अटींची पूर्तता करणे निर्यातदारांना बंधनकारक झाले आहे. त्यासाठी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असल्याची माहिती मंडळाचे शेतमाल निर्यात व्यवस्थापक सतीश वराडे यांनी दिली.





**वाशी येथील पणन मंडळाच्या सुविधा केंद्रावर निर्यातीपूर्वी निरीक्षकांमार्फत शेतमालाची तपासणी करण्यात येऊन तो पॅकिंग केला जातो.**

### ...या देशांना झाली शेतमाल निर्यात

निर्यात सुविधा केंद्रावरून निर्यात होणाऱ्या शेतमालामध्ये द्राक्षे, कांदा, केळी, आंबा, भाजीपाला, फळे, पशुखाद्य, आटा, सुजी, मैदा, फुले यांचा समावेश आहे. शेतमाल निर्यात ही युरोप, दुबई, इराण, श्रीलंका, थायलंड, रशिया, इंग्लंड, युरोपियन देश, ऑस्ट्रेलिया, कतार, जपान, सिंगापूर, कॅनडा, अमेरिका, नेदरलँड, जर्मनी व नेपाळ या देशांना झाली आहे. दरम्यान, पणन मंडळाची प्रकल्पनिहाय क्षमता पाहता प्रशीतकरण ३०१ मे. टन, शीतगृह ४०४० मे. टन व रायपनिंग चेंबर २४० मे. टनाइतकी क्षमता राज्यात निर्माण झाली आहे. या सुविधांचा शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्था, खासगी निर्यातदार आदींमार्फत वापर करण्यात येत असून, सर्व फळे व भाजीपाल्याची व इतर कृषिमालाची निर्यात सुरळीतपणे सुरू आहे.

कृषी पणन मंडळाने राज्यामध्ये ४८ निर्यात सुविधांची उभारणीही केली आहे. यामध्ये प्रीकुलिंग, कोल्ड स्टोअरेज, रायपनिंग चेंबर, पॅकहाऊस, विशेष प्रक्रिया सुविधांमध्ये प्रामुख्याने विकिरण प्रक्रिया, व्हेपर हीट ट्रिटमेंट प्रक्रिया, हॉट वॉटर प्रक्रियेचा समावेश आहे. आशियाई विकास बँक साहाय्यित महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पांतर्गत १६ सुविधांचे नुकतेच विस्तारीकरण व सुधारणा केली आहे. त्याचा फायदा कृषिमाल निर्यातीस होत आहे.

- **संजय कदम**, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

Pudhari, 21/02/2026

# निर्यातीला २५ हजार कोटींचे बळ

## पीयूष गोयल यांनी जाहीर केली सातकलमी योजना

**नवी दिल्ली :** निर्यातीला बळ मिळावे, बाजारपेठेचा विस्तार व्हावा, यासाठी केंद्र सरकारने सातकलमी निर्यात योजना जाहीर केली आहे. सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योगांना (एमएसएमई) समोर ठेवून ही योजना तयार करण्यात आली आहे. त्यासाठी २५ हजार ६० कोटी रुपयांची निर्यात प्रोत्साहन अभियानाची (ईपीएम) घोषणा केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी शुक्रवारी केली.

हा कार्यक्रम भारताच्या व्यापक आर्थिक परिवर्तनाचा एक भाग असेल. केवळ भारतासाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी विकसित भविष्याचा केंद्रबिंदू ठरेल. यामुळे आपल्या तरुणांना आणि महिलांना संधी उपलब्ध होईल, असे गोयल म्हणाले. या अभियानाची घोषणा २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली होती. निर्यातदारांना येणाऱ्या अडचणी सुटाव्यात, त्यांचा निर्यातीचा खर्च कमी व्हावा, वाहतुकीच्या आव्हानातून सुटका व्हावी, यासाठी ही योजना जाहीर करण्यात आली आहे.

### निर्यातवाढीसाठी एआयचा वापर

निर्यातवाढीला चालना देण्यासाठी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय), मशिन लर्निंग (एमएल), क्वांटम कॉम्प्युटिंग आणि भाषा मॉडेल डेव्हलपमेंटसारख्या संसाधनांची मदत घेतली जाईल. प्रसंगी आपले स्वतःचे भाषा मॉडेल (एलएलएम) विकसित केले जाईल.

**निर्यातदारांना अर्थसहाय्य**

ऑनलाइन माध्यमातून निर्यात करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने दोन पतपुरवठा सुविधा सुरू केल्या आहेत. ई-कॉमर्स पतपुरवठा सुविधेअंतर्गत ९० टक्के हमीसह ५० लाखांपर्यंत पतपुरवठा उपलब्ध होतो.

**किफायतशीर दरात खेळते भांडवल**

एमएसएमईंना अल्पकालीन खेळते भांडवल मिळविण्यासाठी आव्हानांचा सामना करावा लागतो. यावर उपाय म्हणून सरकार रिझर्व्ह बँक अथवा आंतरराष्ट्रीय वित्त सेवा केंद्र प्राधिकरण यांसारख्या संस्थांद्वारे हाताळल्या जाणाऱ्या निर्यात फॅक्टरिंग व्यवहारांवर २.७५ टक्के व्याज अनुदान देईल.

**नवीन बाजारपेठेतील प्रवेश सुलभ**

कन्फर्म्ड लेटर्स ऑफ क्रेडिट आणि क्रेडिट एनहान्समेंट स्कीम्सद्वारे नवीन किंवा आव्हानात्मक बाजारपेठांमध्ये प्रवेश करू इच्छिणाऱ्या निर्यातदारांना सरकार पाठिंबा देईल. यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित आर्थिक जोखीम कमी होईल.

**कागदपत्रे, प्रमाणपत्रांची पूर्तता वेगाने**

निर्यातदारांसाठी आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मानकांची पूर्तता करणे महागडे ठरते. व्यापार नियमन, मान्यता आणि अनुपालन सक्षमीकरण (ट्रेस) आणि प्रमाणपत्राच्या खर्चाचा काही भाग निर्यातदारांना सरकारकडे मागता येईल. याअंतर्गत ६० ते ७५ टक्क्यांपर्यंत रक्कम परत मिळवता येईल. प्रतिनिर्यात संस्थेची वार्षिक मर्यादा २५ लाख रुपये असेल.

**विदेशात माल ठेवण्याची सुविधा**

निर्यातदारांना जागतिक वितरण नेटवर्कशी जोडलेल्या ई-कॉमर्स निर्यात केंद्रांसह परदेशी गोदामे आणि इतर पायाभूत सुविधा मिळविणे सुलभ होईल. त्यामुळे दळणवळण खर्चात बचत होईल.

**दुर्गम भागातील निर्यातदारांना मिळणार फायदा**

ईशान्येकडील राज्य आणि डोंगराळ प्रदेशांतील निर्यातदारांना वाहतूक खर्च जास्त येतो. त्यांच्यासाठी लॉजिस्टिक्स इंटरव्हेंशन्स फॉर फ्रीट अँड ट्रान्सपोर्ट (लिफ्ट) उपक्रम राबविण्यात येईल. मालवाहतूक खर्चाच्या ३० टक्क्यांपर्यंत रकमेचा भार सरकार उचलेल. याची मर्यादा वार्षिक २० लाख रुपये आहे.

Agrowon, 15/02/2026

# अन्न प्रक्रिया उद्योगात राज्याची आघाडी कायम

## प्रक्रियेतील गुंतवणूक तीन हजार कोटींच्या पुढे

अॅग्रोवन वृत्तसेवा



**पुणे :** देशाच्या सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारणीत राज्याने आघाडी कायम ठेवली आहे. यातील गुंतवणूक आता तीन हजार कोटींच्या पुढे गेली आहे. तसेच शासकीय बीज भांडवल वाटपदेखील १९२ कोटींपर्यंत पोहोचले आहे.

केंद्र सरकारने छोट्या अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी 'एक जिल्हा एक उत्पादन' धोरण घोषित केले. त्यासाठी २०२० मध्ये पाच वर्षे कालावधी असलेली 'पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना' (पीएमएफएमई) आणली होती. त्यामुळे केवळ दहा टक्के स्वभांडवल व उर्वरित बँक कर्ज असल्यास दहा लाखांपर्यंत अनुदान मिळण्याची सोय झाली. ही योजना गेल्या वर्षी समाप्त झाली होती. मात्र राज्य सरकारच्या आग्रहानंतर एक वर्षाची त्याला मुदतवाढ मिळाली. मुदतवाढीमुळे राज्यातील प्रकल्पांना अर्थसाह्यापोटी अधिकचे ६१ कोटी रुपये मिळाले आहेत.

कृषी विभागाच्या सूत्रांनी सांगितले, की राज्यातील २३ हजार २८४ छोट्या उद्योजकांना या योजनेतून १३७ कोटींचे बीज भांडवल मिळाले. मुदतवाढीनंतर आणखी सव्वाचार हजारांहून अधिक लाभार्थ्यांना भांडवल मिळाले. यामुळे बीज भांडवल मिळालेल्या उद्योजकांची संख्या आता २७ हजार ६२३ झाली आहे. याशिवाय ४८७ गटांनी देखील अन्न प्रक्रिया उद्योग सुरू केले. योजनेतील गट व वैयक्तिक प्रकल्प मिळून

पान ४ वर »

# अन्न प्रक्रिया उद्योगात राज्याची आघाडी कायम

» पान १ वरून

अन्न प्रक्रिया उद्योगातील गुंतवणूक आता तीन हजार १०० कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. ग्रामीण व शहरी भागात सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग सुरू करणाऱ्या स्वयंसहाय्यता गट किंवा त्यातील सदस्यांना या योजनेमुळे लहान यंत्र खरेदी करणे शक्य झाले आहे. त्यासाठी प्रतिगट कमाल चार लाख रुपये किंवा गटातील प्रतिसदस्य कमाल ४० हजार रुपयांचे खेळते भांडवल मिळते आहे. शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ), शेतकरी कंपन्या (एफपीसी) किंवा स्वयंसाह्यता समूहांना (एसएचजी) मार्केटिंग व ब्रँडिंगसाठी मदत मिळते. ही मदत प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के असून, आतापर्यंत चार प्रकल्पांना मदत मिळाली आहे. याशिवाय एफपीओ, एफपीसी, एसएचजी, सहकारी संस्था, सहकारी संघ किंवा सरकारी संस्थांना अन्न प्रक्रिया प्रकल्पांकरिता सामाईक पायाभूत सुविधा उभारणी करता येते. त्यासाठी तीन कोटी रुपयांपर्यंत अनुदान मिळते. आतापर्यंत ६५ प्रकल्पांना अनुदान मिळाल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले.

**अर्थसाह्य मिळविण्यासाठी येथे करा अर्ज**

वैयक्तिक, गट, सामाईक पायाभूत सुविधा घटकासाठी
अर्ज करण्याचे संकेतस्थळ : www.pmfme.mofpi.gov.in

**बीज भांडवल घटकासाठी अर्ज करण्याचे संकेतस्थळ :**

ग्रामीण भागाकरिता www.nrlm.gov.in
तसेच, शहरी भागाकरिता www.nulm.gov.in

Agrowon, 05/02/2026



# शेती, डेअरी क्षेत्राला व्यापार करारात संरक्षण

## वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांची संसदेत माहिती



**पुणे :** व्यापार करारात शेती आणि डेअरी क्षेत्राचे संरक्षण केल्याची री वाणिज्यमंत्र्यांनी संसदेत पुन्हा ओढली. अमेरिकेने आयात शुल्क कमी केल्याचीही माहिती दिली, पण भारताने आयात शुल्क किती केले, कोणत्या मालाला सवलती दिल्या त्याविषयी चकार शब्दही काढला नाही. त्यामुळे अमेरिकेंच्या शेतीमाल आयातीचा प्रश्न अनुत्तरितच राहिला. सरकारच्या या भूमिकेवर विरोधकांनी जोरदार टीका केली आहे.

केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी बुधवारी (ता.४) लोकसभा आणि राज्यसभेत व्यापार कराराविषयी निवेदन केले. पण या निवेदनातून संभ्रम दूर होण्याऐवजी वाढला. गोयल यांनी अमेरिकेने आयात शुल्क १८ केल्याचा फायदा भारताला किती होईल, हे पुन्हा ठासून सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनी आपल्या निवेदनात भारताने अमेरिकेच्या आयातीवरील शुल्क शून्य केले किंवा किती केले याची माहिती दिली नाही. तसेच अमेरिकेच्या कोणत्या शेतीमालासाठी बाजारपेठ खुली केली, किती आयात होणार याचीही माहिती दिली नाही. त्यामुळे भारताने या व्यापार करारात अमेरिकेला नेमक्या काय सवलती दिल्या, याविषयी संदिग्धता कायम आहे.

मंत्री गोयल म्हणाले, की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फेब्रुवारी २०२५ च्या अमेरिका दौऱ्यानंतर दोन्ही देशांमध्ये द्विपक्षीय व्यापार कराराविषयी चर्चा सुरु होती. गेल्या वर्षभरात दोन्ही देशांच्या वाटाघाटी करणाऱ्या प्रतिनिधींनी विविध स्तरांवर सविस्तर चर्चा केली. दोन्ही बाजूंच्या महत्त्वाच्या हितसंबंधांचा विचार करता, आपापल्या संवेदनशील आणि महत्त्वाच्या क्षेत्रांचे संरक्षण करणे ही स्वाभाविक

> “
> व्यापार करार झाला हे खासदारांना भारत सरकारकडून नाही तर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांकडून कळाले, हा संसदेचा अपमान आहे. आपल्या मंत्र्यांकडून ही माहिती मिळत नाही. अमेरिकेच्या कृषिमंत्री सांगतात की भारताची मोठी बाजारपेठ खुली झाली आणि आता निर्यात वाढून ग्रामीण अमेरिकेत पेसा खेळेल. पैसा तिकडे खेळणार आहे मग आमच्या शेतकऱ्यांचे काय? तुम्ही शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करता की शेतकऱ्यांच्या विरोधात काम करता, एकदा आम्हाला सांगून टाका. तुम्ही शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार होतात. पण आता मी म्हणेल, तुमच्याकडून उत्पन्न दुप्पट होत नसेल तर किमान शेतकऱ्यांना जगू तरी द्या. तुम्ही शेतकऱ्यांना मारत आहात.
>
> **- मल्लिकार्जुन खर्गे,** विरोधीपक्षनेते, राज्यसभा



बाब आहे आणि सर्वोत्तम निकाल मिळवण्याचा प्रयत्न दोन्ही देशांनी केला. या चर्चांदरम्यान भारतीय बाजूने विशेषतः कृषी आणि दुग्ध-व्यवसायासारख्या संवेदनशील क्षेत्रांतील हितसंबंध यशस्वीपणे जोपासण्यात आल्याचे मंत्री गोयल यांनी सांगितले. तर वर्षभर चाललेल्या चर्चेनंतर दोन्ही देशांनी द्वीपक्षीय व्यापार करारातील विविध क्षेत्रांना अंतिम स्वरूप देण्यात यश मिळवले आहे, असा दावा त्यांनी केला.

“२ फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात द्वीपक्षीय कराराच्या अनेक मुद्द्यांवर फोनवरून चर्चा झाली. त्यानंतर ट्रम्प यांनी भारताच्या वस्तू आयातीवरील शुल्क घटवून १८ टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतावर लागू होणारे आयात शुल्क शेजारच्या देशांपेक्षा कमी आहे. त्यामुळे भारताच्या निर्यातदारांना अमेरिकेच्या बाजारात स्पर्धा करणे सोपे जाणार आहे,” अशी माहिती देताना भारताच्या संवेदनशील क्षेत्राला पूर्णपणे संरक्षणे देण्यात आल्याचा श्री. गोयल यांनी पुनरुच्चार केला. भारत आणि अमेरिका अनेक पातळ्यांवर पूरक अर्थव्यवस्था आहेत, असे सांगताना त्यांनी हा करार देशातील उद्योग, लघू आणि मध्यम उद्योग, कुशल कामगारांसाठी नवीन संधी निर्माण होणारा असल्याचा दावा केला. यापुढे वाटाघाटींना अंतिम रूप देऊन तांत्रिक तपशिलाची कामे पूर्ण करून दोन्ही देश कराराची कागदपत्रे तयार करतील. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कराराचा तपशील घोषित करण्यात येईल. भारत जसजसा विकसित अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत आहे तसे आपल्याला ऊर्जा, विमान, डेटा केंद्र, परमाणू ऊर्जा या सह अनेक क्षेत्रात आपली क्षमता वाढविण्याची आवश्यकता आहे. अमेरिका या क्षेत्रात जगातील आघाडीवरचा देश आहे. त्यामुळे या क्षेत्रातील व्यापारावर लक्ष केंद्रित करणे आपल्यासाठी स्वाभाविक आहे. त्यामुळे केवळ आयातच नाही तर निर्यातीतही वाढ होईल. या करारामुळे भारताची अनेक क्षेत्रातील निर्यात अमेरिकेला मोठ्या प्रमाणात वाढेल. हा करार देशाच्या हिताचा आहे.”

Date 04/02/2026

पुढारी www.pudhari.com pudhari/news 020/67639900 अर्थ-उद्योग पुणे

# भारतीय निर्यातीला मोठा दिलासा

- अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क २५ टक्क्यांवरून १८ टक्के केले
- तांदूळ व समुद्री अन्न निर्यातीला मोठा फायदा अपेक्षित
- कामगारप्रधान उद्योगांसाठी मूडीजकडून सकारात्मक मूल्यांकन; भारत-अमेरिका व्यापारसंबंधांना नवी चालना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवरील प्रतिपूर्ती शुल्क २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची घोषणा केल्यानंतर मंगळवारी भारतातील निर्यातप्रधान क्षेत्रांत आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. तांदूळ, समुद्री अन्न, वस्त्रोद्योग, रत्ने व दागिने अशा अनेक क्षेत्रांसाठी हा निर्णय मोठा दिलासादायक ठरला आहे.

**तांदूळ निर्यातदारांना स्पर्धात्मक फायदा**

इंडियन राईस एक्सपोर्टर्स फेडरेशनच्या मते, नव्या दरामुळे भारताला थायलंड व पाकिस्तानसारख्या स्पर्धक देशांशी किंमत समता साधता येणार आहे. ईआरएफएचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रेम गर्ग यांनी याला किंमत समतेसाठी महत्त्वाचा विजय असे संबोधले.

## वॉशिंग्टन – नवी दिल्ली व्यापारसंबंधात नवे पर्व



राईसव्हिला ग्रुपचे सीईओ सूरज अग्रवाल म्हणाले की, अमेरिकेसारख्या उच्च-मूल्य बाजारात भारतीय तांदळाला आता समान संधी मिळणार आहे. यंदा सुमारे १४९ दशलक्ष मेट्रिक टन इतक्या विक्रमी उत्पादनाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय निर्यातीला गती देईल, असे मत व्यक्त करण्यात येत आहे.

### मूडीजचा सकारात्मक सूर

मूडीज रेटिंग्सने हा निर्णय कामगारप्रधान क्षेत्रांसाठी क्रेडिट-पॉझिटिव्ह असल्याचे नमूद केले. रत्ने, दागिने, वस्त्रे आणि परिधान उद्योगाला विशेष फायदा होईल, तर औषधे व ग्राहक इलेक्ट्रॉनिक्सवर फारसा परिणाम होणार नाही. रशियन तेल खरेदीबाबत मूडीजने सावध भूमिका घेतली असून, अचानक बदल महागाई वाढवू शकतो, असा इशारा दिला आहे.

**आकडेवारीतून दिसणारी लवचिकता**

आयआरईएफच्या माहितीनुसार, शुल्कवाढीच्या काळातही भारतीय कृषी उत्पादनांनी लवचिकता दाखवली. एप्रिल ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान बासमती तांदळाची निर्यात १,९९,५५८ टन (रु. १,७४९.१७ कोटी) इतकी झाली, तर नॉन-बासमतीची निर्यात ४०,९६० टन (रु. २८४.१२ कोटी) इतकी नोंदवली गेली. इराण मार्गावरील संभाव्य अतिरिक्त करांबाबतही सध्या व्यापारात अडथळे येणार नसल्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

**समुद्री अन्न उद्योगालाही आशा**

सीफूड एक्सपोर्टर्स असोसिएशन ऑफ इंडियाने (सी) सांगितले की, शुल्क कमी झाल्यामुळे अमेरिकेकडे होणारी मासे व कोळंबी निर्यात पुन्हा वाढेल.